ePaper

## खरगे 'इंडिया'चा पंतप्रधानपदाचा चेहरा? नितीश कुमारांच्या नाराजीची चर्चा



| वर्ष - 7 | अंक - 228 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- पराभवाचे दुःख कमी होईल!
- डंकी'ने पार केला 100 कोटींचा टप्पा
- खरगे पंतप्रधानपदाचा चेहरा?
- एकत्र या, अन्यथा आम्ही एकटे लढू!


www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 26 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## शिरूर- मावळ लोकसभेसाठी लांडे-वाघेरे अन् लांडगे मैदानात

# मामा-भांजेंना 'दिल्लीचे वेध'!

## » मावळातून संजोग वाघेरे, शिरुरमधून विलास लांडे तीव्र इच्छुक

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**आगामी लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवडमधील मातब्बर घराणी सक्रीय झाली असून, शिरुर लोकसभा मतदार संघातून माजी आमदार विलास लांडे यांनी मैदानात उडी घेतली आहे. तर, मावळ लोकसभा मतदार संघासाठी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे कट्टर समर्थक माजी महापौर संजोग वाघेरे यांनी 'शिव बंधन' हातात बांधण्याची तयारी केली आहे. योगायोग म्हणजे लांडे आणि वाघेरे यांचे नात्याने भाचे लागणारे भाजपाचे आमदार महेश लांडगे यांचेसुद्धा शिरुरसाठी नाव चर्चेत आहे. त्यामुळे मामा- भांजेना आता 'दिल्लीचे वेध' लागले आहेत, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.**





आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक असलेले संजोग वाघेरे पाटील यांनी आज थेट मातोश्रीला भेट दिली.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची त्यांनी भेट घेतली आहे. वाघेरे यांच्या भेटीमुळे पिंपरी चिंचवड शहरातील राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली असून आता ते नेमकी काय भूमिका घेत आहेत हे पण महत्त्वाचे ठरणार आहे. संजोग वाघेरे पाटील पिंपरी चिंचवड शहरातील शांत, संयमी आणि लोकाभिमुख नेतृत्व.. सुरुवातीपासून अजित पवार यांचे खंदे समर्थक असे त्यांची ओळख.

नगरसेवक, महापौर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अशी महत्त्वाची पदे त्यांनी भूषविले आहेत.

### शिरुरमधून विलास लांडे यांनी दंड थोपटले...

»दुसरीकडे, शिरुर लोकसभा मतदार संघातून माजी आमदार विलास लांडे यांनी दंड थोपटले आहेत. राष्ट्रवादीचे नेते व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संधी दिल्यास लोकसभा निवडणूक लढवणार आहे. २००९ मध्ये मी ही निवडणूक लढवली होती. त्यानंतर २०१४ मध्ये मी तयारी केली होती. २०१९ मध्येही मी पूर्ण ताकदीने तयारी केली होती. मात्र, त्यावेळी पक्षश्रेष्ठींनी डॉ. अमोल कोल्हे यांना संधी दिली.

आता महायुतीच्या माध्यमातून भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे आहेत. भोसरीत सुमारे साडेपाच लाख मतदार आहेत. त्यामुळे राजकारणापलिकडे जावून आणि एकत्र बसून आम्ही ही निवडणूक लढवणार आहोत. केवळ अजित पवार यांनी संधी द्यावी, अशी इच्छा लांडे यांनी जाहीरपणे बोलून दाखवली आहे.

### शहराच्या राजकारणात महेश लांडगे केंद्रस्थानी...

»पिंपरी-चिंचवड शहराचे राजकारण नाती-गोती, गावकी-भावकी भोवती फिरणारे आहे. माजी आमदार विलास लांडे आणि माजी महापौर संजोग वाघेरे हे दोन्ही नेते आमदार महेश लांडगे यांचे नात्याने मामा लागतात. शिरुर आणि मावळ लोकसभा मतदार संघात कोणत्या ना कोणत्या पक्षाच्या तिकीटावर हे दोन्ही नेते मैदानात उतरणार आहेत. भोसरीत एकत्र बसून निर्णय घेवू... महायुती म्हणून उमेदवारी मिळवू ... असा दावा लांडे यांनी केला आहे. तर, मावळ मतदार संघातील नात्या-गोत्यांचा फायदा वाघेरे यांना होणार आहे. कारण, मावळात लांडे-लांडगे यांचा मोठा जनसंपर्क आहे. विशेष म्हणजे, भाजपाकडून महेश लांडगे शिरुरचे उमेदवार होवू शकतात. त्यामुळे 'महायुती' आणि भोसरी मतदार संघात राजकारणापलिकडे जावून एकत्र बसून विचार करू... असा दावा लांडे यांनी केला आहे. परिणामी, शहराच्या राजकारणामध्ये महेश लांडगे पुन्हा एकदा केंद्रस्थानी पहायला मिळत आहेत.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते मावळ लोकसभा मतदारसंघातून तीव्र इच्छुक आहेत. मात्र सध्याच्या परिस्थितीत तिथे महायुतीचे शिवसेना शिंदे गटाचे श्रीरंग बारणे हे खासदार आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी अजित पवार गटाला तेथून उमेदवारी मिळणे याची शक्यता कमीच दिसत आहे. म्हणूनच संजोग वाघेरे पाटील यांनी आज थेट मातोश्री गाठत आपले मनसुबे स्पष्ट केले आहेत.

> "मी लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी तीव्र इच्छुक आहे. मागील निवडणूक देखील मी इच्छुक होतो. तशी तयारी देखील केली होती. आज शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आहे प्रवेश केला नाही. उमेदवारी संदर्भात ते त्यांच्या वरिष्ठ नेत्यांशी, पदाधिकाऱ्यांशी चर्चा करतील आणि मला कळवतील. त्यानंतर मी पुढील भूमिका स्पष्ट करेन.
>
> **-संजोग वाघेरे, माजी महापौर.**

# राज्यावर जलसंकट : अजित पवार

## सर्व धरणांतील पाणीसाठा कमी होत असून राज्यावर जलसंकट

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील सर्व धरणांतील पाणीसाठा कमी होत असून राज्यावर जलसंकट ओढावले असल्याची कबुली राज्याचे उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी येथे सोमवारी दिली. पिण्यासाठी पाणीपुरवठा प्राधान्याने करण्याची सूचना राज्याच्या जलसंपदा विभागाला दिली असून त्यानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल. जुलै २०२४ पर्यंत पिण्यासाठी पाणी राखीव ठेवले जाईल. त्यासाठी मार्च महिन्यात कालवा समितीची बैठक होईल, असेही त्यांनी जाहीर केले.**



अजित पवार यांनी सोमवारी पुण्यात पत्रकारांशी संवाद साधला. राज्यातील मराठवाडा, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि उर्वरीत महाराष्ट्रात पाण्याचे साठे गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी आहेत, असे त्यांनी सांगितले. यंदा पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी झाल्याने अनेक ठिकाणी पाणी टंचाईच्या झळा बसण्यास सुरुवात झाली आहे. त्यानुसार मंत्रिमंडळाच्या प्रत्येक बैठकीमध्ये पाणीसाठ्याबाबत आढावा घेतला जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रथम पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यात यावे, त्यानंतर शेतीला पाणी द्यावे, अशी सूचना जलसंपदा विभागाला केली आहे. त्यानुसार जलसंपदा विभागाकडून नियोजन सुरू झाले आहे, असे त्यांनी सांगितले. खरीपाच्या पिकांनुसार एप्रिल, मे, जून आणि जुलै या चार महिन्यांपर्यंत पाणीसाठा पुरवावा लागले. त्यासाठी मार्च महिन्यात कालवा सल्लागार समितीची बैठक घेतली जाईल. त्यामध्ये उपलब्ध पाणीसाठा, वाटप, गळती, चोरी आणि पाण्याचे बाष्पीभवन या बाबींचा विचार केला जाईल, असेही ते म्हणाले. अपुऱ्या पर्जन्यमानाचा पिकांना फटका बसला आहे. राज्यातील १४ जिल्हे आणि ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून केंद्राच्या दुष्काळी पथकाने त्यासंदर्भातील सर्वेक्षण केले आहे. त्यानुसार ४० तालुक्यांसाठी २५०० कोटी रुपयांची राज्य सरकारकडून मागणी करण्यात आली आहे. विशेषत: केंद्र सरकारच्या निकषानुसार जे तालुके दुष्काळात येत नाही. मात्र, प्रत्यक्षात महसुली मंडळांमध्ये ज्यांचा दुष्काळी भागात समावेश होतो, त्यांच्यासाठी महसूल मंत्री, ग्रामविकास मंत्री, जलसंधारण मंत्री, कृषी मंत्री यांची विशेष समिती स्थापन केली आहे. या समितीच्या तपासणीमध्ये नव्याने १२०० मंडळांमध्ये दुष्काळ असल्याचे समोर आले आहे. राज्यातील सर्व धरणांतील पाणीसाठा कमी होत असून राज्यावर जलसंकट ओढावले असल्याची कबुली राज्याचे उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी येथे सोमवारी दिली. पिण्यासाठी पाणीपुरवठा प्राधान्याने करण्याची सूचना राज्याच्या जलसंपदा विभागाला दिली असून त्यानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल. या मंडळांमध्ये केंद्र सरकारने ज्या सवलती दिल्या आहेत, त्याच सवलती आपत्ती व्यवस्थापन तसेच मदत आणि पुनर्वसन विभागाला राज्याच्या धर्तीवर देण्यात येणार आहे, असे पवार यांनी स्पष्ट केले.

### प्रथम पिण्याच्या पाण्याला प्राधान्य

» राज्यातील दुष्काळी परिस्थिती, विदर्भ आणि मराठवाडा आर्थिक विकास महामंडळ, गौण खनिज आदी प्रश्नांबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.अजित पवार यांनी सोमवारी पुण्यात पत्रकारांशी संवाद साधला. राज्यातील मराठवाडा, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि उर्वरीत महाराष्ट्रात पाण्याचे साठे गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी आहेत, असे त्यांनी सांगितले. यंदा पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी झाल्याने अनेक ठिकाणी पाणी टंचाईच्या झळा बसण्यास सुरुवात झाली आहे. त्यानुसार मंत्रिमंडळाच्या प्रत्येक बैठकीमध्ये पाणीसाठ्याबाबत आढावा घेतला जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रथम पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यात यावे, त्यानंतर शेतीला पाणी द्यावे अशी सूचना जलसंपदा विभागाला केली आहे.

# खासगी बालवाड्यांवर आता सरकारचे नियंत्रण!

## 2020 नुसार पूर्वप्राथमिक शिक्षणात समानता आणण्यात येणार

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०नुसार पूर्वप्राथमिक शिक्षणात समानता आणण्यात येणार आहे. त्यासाठी खासगी बालवाड्यांची मान्यता, किमान सुविधा, अभ्यासक्रम या संदर्भात नियंत्रण आणण्यासाठीच्या नियमावलीचा मसुदा शिक्षण विभागाने तयार करून राज्य शासनाला सादर केला आहे. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात खासगी बालवाड्यांवर नियंत्रणाचे विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे.**

राज्यात शासकीय अंगणवाड्यांसह खासगी बालवाड्या अक्षरश: गल्लोगल्ली आहेत. मात्र त्यावर कोणतेही शासकीय नियंत्रण नाही. बालवाडी सुरू करण्यासाठीची मान्यता प्रक्रियाही सध्या अस्तित्वात नाही. मात्र राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०नुसार पूर्वप्राथमिक शिक्षण आता शिक्षणाच्या चौकटीत आणण्यात आले आहे. तसेच पूर्वप्राथमिक ते दुसरीसाठीचा राज्य स्तरावरील अभ्यासक्रमही तयार करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आता राज्यातील खासगी बालवाड्यांवर सरकारी नियंत्रण आणण्यात येणार आहे. शिक्षण आयुक्त सूरज मांढरे म्हणाले, की खासगी बालवाड्यांवर



नियंत्रण आणण्याबाबतच्या नियमावलीचा मसुदा तयार करून काही दिवसांपूर्वी राज्य शासनाला सादर करण्यात आला. तज्ज्ञांच्या मदतीने सखोल अभ्यास करून ही नियमावली तयार करण्यात आली आहे. त्यात मान्यता प्रक्रिया, अभ्यासक्रम, किमान सुविधा यावर भर देण्यात आला आहे. खासगी बालवाड्यांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने होणाऱ्या शिक्षण प्रक्रियेत समानता आणण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या नियमावलीचे विधेयक तयार होऊन येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडले जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर या नियमावलीची अंमलबजावणी सुरू केली जाणार आहे. राज्य अभ्यासक्रम आराखड्यावर सुमारे बाराशे हरकती-सूचना राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने पायाभूत स्तरासाठीचा राज्य अभ्यासक्रम आराखडा तयार करून जाहीर केला होता. तसेच त्यावर हरकती सूचना मागवल्या होत्या. या आराखड्यावर आलेल्या सुमारे बाराशे हरकती-सूचना विचारात घेऊन आता लवकरच अंतिम आराखडा जाहीर करण्यात येणार आहे.

### नियमावलीचा मसुदा तयार

» पूर्वप्राथमिक ते दुसरीसाठीचा राज्य स्तरावरील अभ्यासक्रमही तयार करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आता राज्यातील खासगी बालवाड्यांवर सरकारी नियंत्रण आणण्यात येणार आहे. शिक्षण आयुक्त सूरज मांढरे म्हणाले, की खासगी बालवाड्यांवर नियंत्रण आणण्याबाबतच्या नियमावलीचा मसुदा तयार करून काही दिवसांपूर्वी राज्य शासनाला सादर करण्यात आला. तज्ज्ञांच्या मदतीने सखोल अभ्यास करून ही नियमावली तयार करण्यात आली आहे.

# पिंपरी-चिंचवडची ओळख सांस्कृतिक नगरी होईल!

## उपमुख्यमंत्री अजित पवार : नाट्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड येथे आयोजित शंभराव्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. 100 व्या नाट्य संमेलनामुळे पिंपरी-चिंचवड शहराची ओळख सांस्कृतिक नगरी म्हणून होईल आणि हे संमेलन वेगळ्या उंचीवर जाणारे ठरेल, असा विश्वास पवार यांनी यावेळी व्यक्त केला.**

कार्यक्रमाला आमदार अण्णा बनसोडे, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, डॉ.पी.डी. पाटील, प्रकाशशेठ धारीवाल, माजी आमदार विलास लांडे, कृष्णकुमार गोयल,अखिल भारतीय नाट्य परिषदेचे पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, राजकुमार साकला, सचिन इटकर आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, मराठी नाट्य संमेलनाला गौरवशाली इतिहास आहे. विष्णुदास भावे यांनी 'सीता स्वयंवर'च्या माध्यमातून मराठी नाटकाची मुहूर्तमेढ रोवली. मराठी माणसाचे नाट्यवेड सर्वश्रुत आहे आणि म्हणूनच नाट्य चळवळ पुढे जाते आहे. प्रत्येक शहरात चांगले नाट्यगृह असावे असा प्रयत्न सुरू आहे. नाट्यगृहाच्या माध्यमातून नव्या कलाकारांना कला सादर करण्याची संधी मिळत असते. त्यांना चांगल्या सुविधांच्या माध्यमातूनप्रोत्साहन देण्यासाठी नाट्यगृहाच्या देखभालीकडे संबंधितांनी लक्ष घालावे, असे आवाहन त्यांनी केले.




### नाट्य परिषद विविध उपक्रम राबवणार...

पिंपरी-चिंचवड शहराची अनेकांच्या प्रयत्नातून प्रगती झाली. सर्वांच्या सहकार्याने शहराचे विकसित स्वरूप समोर आले आहे. या विकासाला साहित्य, कला, संस्कृतीची जोड असणे महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने हे संमेलन उपयुक्त ठरेल आणि उद्योगनगरीची वाटचाल सांस्कृतिक नगरीकडे होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शासनाने नाट्य संमेलनासाठी 10 कोटी रुपये दिले असून या निधीतून नाट्य परिषद विविध उपक्रम राबविणार आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनेही नाट्य संमेलनासाठी आवश्यक सहकार्य करावे असेही उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.

> मराठी नाटकांनी मनोरंजनासोबत सामाजिक, राजकीय, कौटुंबिक विषयांना स्पर्श केला. नाटकांमध्ये समाजाचे प्रतिबिंब असते. कोरोनामुळे नाट्यसृष्टीला फटका बसला आणि काहींचे संसार विस्कळीत झाले. अशावेळी शासनाने कलाकार आणि पडद्यामागच्या कलावंतांनाही मदत करण्याचा प्रयत्न केला. अशा अनेक अडचणींना सामोरे जात नाट्य चळवळ इथवर पोहोचली याचा मनापासून आनंद आहे.
>
> **- अजित पवार, उपमुख्यमंत्री.**

---

# वाजपेयी यांचे कार्य राष्ट्राप्रति निष्ठेचे 'अटल' प्रतिक!

## शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या भावना: जयंतीनिमित्त भाजपतर्फे अभिवादन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारताप्रती असलेले निस्वार्थ समर्पण व पन्नास वर्षाहून अधिक काळ देशासाठी दिलेल्या निस्पृह सेवेबद्दल स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी नावाप्रमाणेच एक ज्येष्ठ भारतीय नेते, निष्णात राजकारणी, निस्पृह सामाजिक कार्यकर्ते, बलवान वक्ते, कवी, साहित्यिक, पत्रकार व खऱ्या अर्थाने बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. जनसामान्यांच्या आशा आकांक्षा स्वर्गीय वाजपेयी यांनी पूर्ण केल्या. त्यांच्या कार्यातून आजही त्यांची राष्ट्राप्रती असलेली निष्ठा प्रतीत होते, असे मत भाजप पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) अध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केले.**



देशाचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या ९९ व्या जयंती निम्मित मोरवाडी, पिंपरी येथील कार्यालयात भाजप पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा )च्या वतीने शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी, प्रदेश उपाध्यक्ष अमर साबळे, आमदार उमाताई खापरे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे, युवा मोर्चा प्रदेश चिटणीस तेजस्विनी कदम, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, सरचिटणीस नामदेव ढाके, संजय मंगोडेकर, मंडल अध्यक्ष प्रसाद कस्पटे, संदीप नखाते, निलेश अष्टेकर, यांच्यासह विविध आघाड्या व प्रकोष्ठचे पदाधिकारी उपस्थित होते.

### सुशासन दिन अन् वाजपेयी यांचे स्मरण...

शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले पुढे कि, महिला सबलीकरण व सामाजिक समानतेचे खंबीर समर्थक असलेले स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्व देशांमध्ये एक दूरदर्शी, विकसित आणि मजबूत राष्ट्र म्हणून बघू इच्छित होते. पाच वर्षांची ऐतिहासिक संस्कृती लाभलेल्या व आगामी एक वर्षांमध्ये येणारी आव्हाने पेलण्यास तयार असलेल्या भारत देशाचे प्रतिनिधित्व त्यांनी केले. स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंती दिनी 25 डिसेंबर रोजी देशभरात "सुशासन दिन" म्हणून आजचा दिवस संस्मरणीय बनविण्यात येत आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सुशासन दिन होत आहे. पूज्य अटलजींच्या गुणांचे स्मरण करण्यासाठी शहरात प्रत्येक बूथवर कार्यकर्ते रचनात्मक कार्यक्रम आयोजित केले आहे. केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या गरीब व शेतकरी कल्याणकारी योजनांचे यश व सुशासन याबाबत लाभार्थ्यांना माहिती देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.




# ‘जातिअंताच्या लढाई’चे भले होणार का?

**सामाजिक- सांस्कृतिक पाळेमुळे घट्ट झालेली वर्णव्यवस्था आणि आर्थिक पायावरली वर्गव्यवस्था यांचा विचार विवेकानंदांसह अनेकांनी केला होता. मराठा आरक्षणासाठीची जरांगे यांची मागणी त्या प्रश्नांकडे पुन्हा पाहायला लावणारी कशी, हे सांगणारे दहा मुद्दे ...**

मराठ्यांचे आरक्षण हा महाराष्ट्रातील कळीचा प्रश्न आहे आणि जरांगेंच्या आंदोलनामुळे तो ज्वालाग्राही बनून केंद्रस्थानी आला आहे. जरांगेना मराठा समाजातून मिळालेला प्रतिसाद अभूतपूर्व आहे. हे आंदोलन आणि त्याला मिळालेला विश्वास बसू नये एवढा प्रतिसाद या दोन गोष्टी आपणाला पुन्हा या देशातील सनातन जातिव्यवस्थेकडे घेऊन जातात. या देशाच्या अवनतीचे एकमेव किंवा प्रमुख कारण जातिव्यवस्था हे आहे, असे गौतम बुद्ध आणि विवेकानंद या दोघांनीही सांगितले आहे. या जाती व्यवस्थेचा पिरामिड किंवा चक्रव्यूह यांना थोडासा तरी धक्का बसावा म्हणून आरक्षण सुरू झाले. जातिअंताच्या लढाईतील ते पहिले पाउल होते- मात्र जरांगेंच्या आंदोलनामुळे आपण जे आरक्षणाचे पाऊल उचलले त्यामुळे आता जातिव्यवस्था खिळखिळीत न होता ती अधिकाधिक बळकट होते आहे का हा प्रश्न आपल्यापुढे येतो. यावर साधकबाधक चर्चा होणे गरजेचे वाटते. त्यामुळे खालील



मुद्दे चर्चेसाठी पुढे मांडत आहे. १) समाजाच्या ठसठसणाऱ्या वेदनेवर आपण नेमके बोट ठेवले, तर तो सारा समाज झपाटून तुमच्या मागे उभा राहतो. तरुणपणी बाळ ठाकरे यांनी शिवसेना स्थापन केली, त्यावेळी आपण हे पाहिलेले आहे. मात्र, या अशा आंदोलनातून प्रश्न थोडाफार सुटला असे वाटले, तरी तो फार थोडा सुटलेला असतो आणि या अशा आंदोलनांसाठी किमान त्यांच्या सुरुवातीच्या दिवसात पैसा आणि व्यवस्थापन पुरविणारी एक आपल्याला फारशी लक्षात न येणारी एखादी चाणाक्ष शक्ती असते. शिवसेना ही प्रथम वसंत सेना होती आणि आजच्या जरांगेंच्या आंदोलनामागे शरद पवार आहेत, की अमित शहा याबाबतही खासगीत चर्चा होते.- अर्थात आजचा हा प्रश्न समजावून घेण्याचा प्रयत्न करताना हा मुद्दा आपण विचारात घेऊ नये, असे मला वाटते. त्याचप्रमाणे शिवसेनेच्या वेळी मराठी तरुण आणि दक्षिणेतील तरुण, जे दोघेही हताश होऊन नोकरीच्या शोधात हिंडत होते. त्यांच्यात कटुता निर्माण झाली. त्याचप्रमाणे आज मराठा समाज आणि ओबीसी समाज यांच्यात कडवटपणा वाढतो आहे, मात्र आपल्या चर्चेत हे विचारात न घेता- वर्णव्यवस्था आणि वर्गव्यवस्था यांच्यामधील अंगारे- कंगोरे समजावून घेता येतील का? त्यावर चर्चा करता येईल का हे प्रथम पाहिले पाहिजे. २) माणसाने व्यवसाय बदलला तर त्याची जात बदलते का? म्हणजे एखाद्या ब्राह्मणाने लॉन्ड्री काढली, तर तो धोबी किंवा वैश्य होऊ शकतो का? एखाद्या क्षत्रिय व्यक्तीने फर्निचरचे दुकान काढले, तर तो सुतार किंवा वैश्य होऊ शकेल का? ३) साम्यवादी पक्षातून बाहेर पडून ‘सत्यशोधक मार्क्सवादी’ हा पक्ष स्थापन करताना, शरद् पाटील यांच्यापुढे नेमका हाच विचार होता. मात्र, डांगे आणि मधू लिमये या दोघांनाही ‘वर्गलढा यशस्वी झाला तर वर्णव्यवस्था आपोआप कोसळेल,’ असे त्या वेळी वाटत होते. अगदी विंदा करंदीकरसुद्धा ‘सारे वर्ण शेवटी सुवर्णात विलीन होतील’ असे म्हणत होते. ४) उच्चवर्णीयांना दलितांच्या ओबीसींच्या यातना कधी लक्षातच येत नव्हत्या का? आगरकरांनी ‘मंदिर प्रवेश’, ‘एक गाव एक पाणवठा’ असल्या काही गोष्टींचा फारसा विचार केलेला नाही. त्यांच्या समोरचे प्रश्न होते उच्चवर्णीयांचे!- त्यांचे नाव न घेता विवेकानंद म्हणाले होते, ‘विधवा विवाह’ हा प्रश्न प्रमुख म्हणून हे लोक चर्चा का करताहेत? हा प्रश्न या देशातील मुठभर उच्चवर्णीयांचा आहे. ब्राह्मण आणि क्षत्रिय सोडून सर्व समाजात विधवा विवाह, पाट लावून लग्न असे प्रकार आहेत. म्हणजे केवळ आपल्याच प्रश्नांचे तुणतुणे वाजवत उच्चवर्णीय बसले होते का? आपण परिमल राव यांचे ‘द फौंडेशन ऑफ द टिळक्स् नॅशनॅलिझम’ हे पुस्तक वाचले तर कुणबी आणि स्त्रिया यांच्याबद्दल ‘मराठा’मध्ये जे लेख त्यांनतर लोकमान्य टिळकांना ‘तेल्यातांबोळ्यांचे पुढारी’ का म्हटले गेले हा प्रश्न आपणाला पडतो. ५) ते असो! जरांगेचे आंदोलन ‘सारे वर्ण शेवटी सुवर्णात विलीन होतील’ असे काही आपणाला सांगते का?

## संपादकीय »

# कर्जे काढू या!

***भारत सरकारच्या डोक्यावरील कर्ज झपाटयाने वाढत असून लवकरच त्याचा आकार देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाइतका होईल.***

सरत्या वर्षांच्या अखेरच्या सोमवारी भांडवली बाजार उसळण्याची शक्यता असताना आर्थिक इशाऱ्यांची जाणीव करून देणे शहाणपणाचे नाही; हे खरे. पण त्यास इलाज नाही. विशेषत: आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारखी संघटना जेव्हा भारताच्या वेगाने वाढत्या सार्वभौम कर्जाविषयी- म्हणजे सरकारने घेतलेल्या कर्जाविषयी- इशारा देत असेल तर त्याची दखल न घेणे व्यवसायाशी प्रतारणा करणारे ठरेल. या इशाऱ्यांची दखल घेणे आणखी एका कारणासाठी इष्ट ठरते. कारण हीच नाणेनिधी संघटना जेव्हा भारताविषयी बरे काही बोलते तेव्हा आपले राज्यकर्ते त्या कौतुकाच्या माळा गळयातून काढण्यास तयार नसतात. भारतास वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असे ही संघटना वा जागतिक बँक यांपैकी कोणी म्हटले रे म्हटले की आपणास कोण स्फुरण चढते. मग समाजमाध्यमी ‘अर्थ’वटराव ही वक्तव्ये जमेल तितकी ‘व्हायरल’ कशी करता येईल या प्रयत्नांस लागतात.

**२४ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक दिवस म्हणून साजरा केला जातो. कारण २४ डिसेंबर १९८६ रोजी देशामध्ये ‘ग्राहक संरक्षण कायदा १९८६’ लागू झाला. या कायद्यामुळे ‘ग्राहक’ या संज्ञेला राजमान्यता मिळाली. त्यानिमित्ताने ग्राहक म्हणजे काय, त्याचे हक्क इत्यादी अत्यंत महत्त्वाच्या बाबी प्रथमच अधोरेखित करण्यात आल्या.**

# संरक्षणाचा खेळखंडोबा किती दिवस चालणार?

त्यांची पायमल्ली झाल्यास स्वतंत्र न्याययंत्रणाही अस्तित्वात आली. या कायद्यान्वये त्रिस्तरीय ग्राहक तक्रार निवारण यंत्रणा अस्तित्वात आली. जिल्हास्तरावर ग्राहक तक्रार निवारण मंच, राज्यस्तरावर राज्य ग्राहक आयोग आणि राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय ग्राहक आयोग यांची स्थापना करण्यात आली. तीनही यंत्रणांना आर्थिक न्याय क्षेत्र देण्यात आले. त्यामुळे ग्राहकांच्या तक्रारी दूर करण्याचे काम खऱ्या अर्थाने सुरू झाले. कालपरत्वे या कायद्यामध्ये अनेक सुधारणा करण्यात आल्या. मात्र काळ बदलला, स्मार्टफोन, इंटरनेट, ई-कॉमर्स, ऑनलाइन खरेदी इत्यादी गोष्टींमुळे कालसुसंगत नवीन कायदा करण्याची मागणी जोर धरू लागली. त्यामुळेच ‘ग्राहक संरक्षण कायदा २०१९’ तयार करण्यात आला आणि २० जुलै २०20 रोजी तो लागू करण्यात आला. या दरम्यानच्या काळात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले होते. जुन्या कायद्यान्वये स्थापन केलेली तीन स्तरीय तक्रार निवारण यंत्रणा नवीन




कायद्यांमध्ये देखील तशीच ठेवण्यात आली आहे. फक्त जिल्हा ग्राहक मंचाचे नाव बदलून जिल्हा ग्राहक आयोग करण्यात आले. तसेच तीनही आयोगांच्या आर्थिक न्याय क्षेत्रात दोनदा सुधारणा करण्यात आली. केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरण हे नव्याने स्थापन करण्यात आले आणि ग्राहकांच्या अधिकारांच्या रक्षणासाठी या प्राधिकरणाला मोठे आणि महत्त्वाचे अधिकार देण्यात आले. मात्र आज असा प्रश्न पडतो की खरोखरच या सगळ्याचा ग्राहकांना फायदा होतो आहे का? या त्रिस्तरीय तक्रार निवारण यंत्रणा प्रशासकीय दृष्ट्या व इतर बाबतीत सक्षम आहेत का, ज्यायोगे आपली तक्रार घेऊन गेलेल्या ग्राहकांना खरोखरच न्याय मिळेल आणि त्यांच्या अडचणी तक्रारी दूर होतील? दुर्दैवाने आजही याचे उत्तर ‘नाही’ असेच द्यावे लागेल. यामागे अनेक कारणे आहेत. त्यात मुख्य कारण आहे ते म्हणजे राज्य शासनाची उदासीनता. ग्राहक संरक्षण विभागाकडे आवश्यक तेवढे लक्ष राज्य सरकारकडून आजपर्यंत दिले गेले नाही. आज महाराष्ट्रातील जिल्हा ग्राहक आयोग तसेच राज्य आयोग, त्याची नागपूर व औरंगाबाद येथील खंडपीठे व पुणे, नाशिक, अमरावती आणि कोल्हापूर येथील परिक्रमा खंडपीठे यांचा एकूण आढावा घेतल्यास ही वस्तुस्थिती आपल्यासमोर येईल. ‘ग्राहक संरक्षण कायदा १९८६’ अस्तित्वात आला आणि त्यानंतर नवीन कायदा २० जुलै रोजी अस्तित्वात आला. मात्र या कायद्याच्या सक्षम व प्रभावी अंमलबजावणीसाठी ज्या प्रकारचे मनुष्यबळ जागा व इतर प्रशासकीय यंत्रणा उपलब्ध करून देणे आवश्यक होते, त्याकडे राज्य सरकारचे पूर्ण दुर्लक्ष होत आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# एकत्र या, अन्यथा आम्ही एकटे लढू!

## पक्ष वाढवायचा की मोदींचे भूत उतरवायचं : प्रकाश आंबेडकर

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मोदी नावाचे भूत उतरवायचं असेल तर सर्वांनी एकत्र आलं पाहिजे, एक दोन जागा कमी मिळाल्या तरी चालतील पण एकीने लढलं पाहिजे असं आवाहन वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकरांनी (PRAKASH AMBEDKAR) केलं आहे. ते नागपुरात बोलत होते. प्रकाश आंबेडकर हे विरोधकांच्या इंडिया आघाडीमध्ये जाण्यास उत्सुक असून अद्याप त्याचा निर्णय झाला नाही.**

गेल्या काही दिवसांपासून वंचित बहुजन आघाडी 'ॲक्टिव्ह मोड' वर आली असून ठिकठिकाणी सभा, मेळावे घेण्याचे काम सुरु आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर हे नागपूर दौऱ्यावर आहेत. नागपुरात सोमवारी झालेल्या भारतीय स्त्री मुक्ती दिन परिषदेला ते उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी भाजपचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या नागपुरात भाजप आणि संघावर टीकास्त्र सोडत भाषण केलं. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीला कुठल्या पक्षाने सोबत घेतले तर ठीकच अन्यथा, एकटा चलो रे चा नारा देत कार्यकर्त्यांना तयारीला लागा असे देखील सांगितले. त्या 56 इंच छातीमध्ये केवळ गाठी आणि फाफडा आहे. मात्र तुम्ही आमच्या सोबत आलात तर आम्ही आमचे डोकं तुम्हाला देऊ. यावेळी संघावर टीका करताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, आपण आज ज्या नागपुरात आहोत, त्यांच नागपुरात 50 वर्षाआधी आम्ही संविधान मनात नाही, संधी मिळताच आम्ही हे संविधान उलथून लावल्याशिवाय राहणार नाही असे बोलले गेले आहे.

नागपुरात पार पडलेल्या भारतीय स्त्री मुक्ति दिन परिषदेच्या मांचावरून प्रकाश आंबेडकर बोलत होते. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस असेल किंवा इंडिया



आघाडीतील इतर पक्ष असतील त्यांना आम्ही मदत करायला निघालो आहोत. हे प्रतीक्रांतीचे भूत नागपूरातून निघाले आहे. त्याला गाडायला आम्ही निघालो आहे. मात्र दुर्दैवाने ते मलाचा गाडायला निघाले आहे अशी आजची परिस्थिती आहे.

मात्र उद्या काय होईल ते सांगता येत नाही. कोणी 30 जागा लढवणार, कोणी 23 जागा लढवणार, असे बोलले जात आहे. मात्र कुणीही जागा सोडायला तयार नाही. त्यांना मी म्हणेन की आधी बसलेले मोदीचे भूत उतरवा. आता तुम्हाला पक्ष वाढवायचा आहे, की मोदींना घालवायचं आहे हे ठरवा. मोदींना घालवायचं असेल तर दोन तीन जागा कमी आल्या तरी हरकत नाही. मात्र मोदी नावाचे भूत एकदा का तुमच्या बोकांडी बसले तर मग तुम्ही तिहारच्या तुरूंगात गेल्या शिवाय राहणार नाही अशी उपहासात्मक टीका देखील प्रकाश आंबेडकरांनी केली. विषमता, गुलामी, अन्याय अत्याचार हवा असेल तर मग विभक्तपणा हा त्याचा आधार आहे. विभक्तपणा आला तर आपण एकमेकांना कमी लेखतो. ही क्रांती आपण सुरू केली ती मानवतेची क्रांती आहे. विभक्त विरुद्ध एकता प्रस्थापित करण्यासाठी आहे. विभक्तपणामध्येच या देशाची गुलामी आहे. देशातील आताचा लढा हाच आहे असे मी मानतो. मनुस्मृती लागू झाली ती मंदिरातून लागू झाली. मात्र तिच्या जागी जो नवा कायदा आला तो संविधानाच्या रूपाने.

हा कुठल्या मंदिरातून आला नाही, तर तो या देशाच्या संसदेतून आले आहे, संविधान सभेतून आला. सत्तेचे केंद्र आज मंदिर नसून संसद आहे. शिवाजी महाराज राजे होते. मात्र धर्माने मान्यता नव्हती, म्हणून गागाभटांनी शिवराज्याभिषेक करून त्यांना मान्यता दिली. धर्म त्यावेळी मान्यता देता होता. त्यावेळी सेंटर ऑफ पॉवर हा धर्म होता. मात्र आताची सेंटर ऑफ पॉवर हा धर्म, मंदिर, देवळे नाही तर संसद आहे. संसदेवर ज्याचा ताबा आज त्याची व्यवस्था. त्यामुळे संसद आपल्या ताब्यात ठेवली पाहिजे. ज्या दिवशी या विचारांचा पराभव होईल त्या दिवशी आपली देखील हार आहे असे देखील प्रकाश आंबेडकर म्हणाले.

### प्रतीक्रांतीचे भूत नागपूरातून निघाले

गेल्या काही दिवसांपासून वंचित बहुजन आघाडी 'ॲक्टिव्ह मोड' वर आली असून ठिकठिकाणी सभा, मेळावे घेण्याचे काम सुरु आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर हे नागपूर दौऱ्यावर आहेत. नागपुरात सोमवारी झालेल्या भारतीय स्त्री मुक्ति दिन परिषदेला ते उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी भाजपचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या नागपुरात भाजप आणि संघावर टीकास्त्र सोडत भाषण केलं. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीला कुठल्या पक्षाने सोबत घेतले तर ठीकच अन्यथा, एकटा चलो रे चा नारा देत कार्यकर्त्यांना तयारीला लागा असे देखील सांगितले. त्या 56 इंच छातीमध्ये केवळ गाठी आणि फाफडा आहे. मात्र तुम्ही आमच्या सोबत आलात तर आम्ही आमचे डोकं तुम्हाला देऊ. यावेळी संघावर टीका करताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, आपण आज ज्या नागपुरात आहोत, त्यांच नागपुरात 50 वर्षाआधी आम्ही संविधान मनात नाही, संधी मिळताच आम्ही हे संविधान उलथून लावल्याशिवाय राहणार नाही असे बोलले गेले आहे. नागपुरात पार पडलेल्या भारतीय स्त्री मुक्ति दिन परिषदेच्या मांचावरून प्रकाश आंबेडकर बोलत होते. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस असेल किंवा इंडिया आघाडीतील इतर पक्ष असतील त्यांना आम्ही मदत करायला निघालो आहोत. हे प्रतीक्रांतीचे भूत नागपूरातून निघाले आहे. त्याला गाडायला आम्ही निघालो आहे.

# माढ्यातील मोहिते पाटील-निंबाळकर वाद मिटणार का?

## चंद्रशेखर बावनकुळे शिष्टाई करण्यासाठी माढाच्या दौऱ्यावर

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**निवडणुकीचे वेध लागल्यावर आता राज्यातील पक्षांतर्गत वादाचा फायदा विरोधकांना होऊ नये यासाठी भाजप रणनीती आखत असल्याचं दिसून येतंय. त्याचाच एक भाग म्हणून भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे मंगळवारी माढा लोकसभा मतदारसंघाचा दौरा करणार आहेत. या मतदारसंघात विद्यमान खासदार रणजित निंबाळकर आणि मोहिते पाटील यांच्यातील वाद मिटवण्यासाठी ते पुढाकार घेण्याची शक्यता आहे.**

मंगळवारी सकाळी साडेसहा वाजता बावनकुळे फलटण येथे भाजपचे सुपर वॉरियर्स आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत. सायंकाळी पावणेपाच वाजता बावनकुळे माळशिरस मार्गे अकलूज येथील कृष्णप्रिय हॉलमध्ये सुपर वॉरियर्स आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत. यानंतर चंद्रशेखर बावनकुळे हे मोहिते पाटील यांच्या शिवरत्न बंगल्यावर स्नेहभोजन घेऊन चर्चा करतील. माढा लोकसभा मतदारसंघावर धैर्यशील मोहिते पाटील यांनी दावा केल्याने भाजपसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. मोहिते पाटील यांची



माढा लोकसभा मतदारसंघात मोठी ताकद असून मोहिते पाटील यांच्या भाजप प्रवेशानंतर माढा लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादीकडून भाजपाला जिंकता आला होता. मात्र सध्याच्या परिस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील माढा येथील आमदार बबनदादा शिंदे, करमाळाचे आमदार संजयमामा शिंदे, सांगोल्याचे शिंदे सेनेचे आमदार शहाजीबापू पाटील आणि माण खटावचे भाजप आमदार जयकुमार गोरे यांनी आपले वजन विद्यमान खासदार रणजित निंबाळकर यांच्या पारड्यात टाकल्याचे चित्र आहे. आपल्या पहिल्याच टर्ममध्ये खासदार रणजित निंबाळकर यांनी माढा लोकसभा मतदारसंघातील बहुतांश तालुक्यातील पाण्याचे, रस्त्याचे प्रश्न मार्गी लावल्याने मतदारसंघात निंबाळकर यांचा मोठा बोलबाला असल्याची चर्चा आहे. सध्या खासदार निंबाळकर यांनी जिल्ह्यातील मोहिते पाटील विरोधकांची मोट बांधली असून यात माढा, करमाळा, सांगोला आणि माण खटाव येथील चारही आमदार हे रणजित निंबाळकर यांच्यासोबत आहेत.

### राजकारणाचा फायदा राष्ट्रवादीला?

माढ्याच्या राजकारणात मोहिते पाटील आणि खासदार रणजित निंबाळकर यांच्यातील संघर्ष वाढत चालल्याने पक्षाने हा वाद संपविण्याची जबाबदारी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्यावर सोपवली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडेही माढा लोकसभेसाठी तगडा उमेदवार नसल्याने भाजपमधील संघर्षाचा फायदा उठविण्याचा प्रयत्न शरद पवार यांच्याकडून केला जाऊ शकतो. यासाठीच बावनकुळे दुपारचे भोजन फलटण येथे खासदार रणजित निंबाळकर यांचेकडे तर रात्रीचे भोजन मोहिते पाटील यांच्याकडे करणार आहेत .

# खरगे पंतप्रधानपदाचा चेहरा?

## » मुख्यमंत्री नितीश कुमारांच्या नाराजीची चर्चा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीची नुकतीच दिल्लीत एक बैठक पार पडली. या बैठकीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे इंडिया आघाडीचा पंतप्रधानपदाचा चेहरा असतील यावर बरीच चर्चा झाली. आगामी लोकसभा निवडणुकीत पंतप्रधानपदासाठी दलित चेहरा घेऊन भाजपला आव्हान देण्याची मोर्चेबांधणी 'इंडिया'च्या या बैठकीत झाल्याचं बोललं जात आहे.**





गेल्या आठवड्यात झालेल्या इंडी आघाडीच्या बैठकीत आघाडीतल्या नेत्यांनी पंतप्रधानपदासाठी खरगे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला. यावर काही पक्षांची सहमती दर्शवली असली तरी अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. याबाबत पत्रकार परिषदेत खरगे यांना प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले, "आधी एकत्र येऊन निवडणूक जिंकू, मग पंतप्रधानपदाचा विचार करू." तसेच खरगे यांनी पंतप्रधानपदाबाबतच्या चर्चा नाकारल्या नाहीत. दरम्यान, पंतप्रधानपदासाठी इंडिया आघाडीत खरगेंच्या नावाचा विचार सुरू झाल्यापासून बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार नाराज असल्याचं बोललं जात आहे. तसेच या बैठकीत नितीश कुमार यांच्या नावाचा उल्लेखही झाला नसल्याचं सांगितलं जात आहे.

दरम्यान, नाराजीच्या चर्चांवर नितीश कुमार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नितीश कुमार म्हणाले, आम्ही सगळे एकत्र येऊन काम करत आहोत. इंडिया आघाडीच्या पंतप्रधानपदासाठी खरगे यांच्या उमेदवारीबाबत नितीश कुमार म्हणाले, मी जरादेखील नाराज नाही.

मी बैठकीत स्पष्टपणे सांगितलं की, ज्याला पंतप्रधान व्हायचं असेल त्याने व्हावं. माझीही इच्छा नव्हती. बैठकीत मी तेच सांगितलं आहे. मी कधीच पंतप्रधानपदाच्या उमेदवारीबाबत वक्तव्य केलेलं नाही. नितीश कुमार यांनी पंतप्रधानपदाच्या उमेदवारीबाबत वक्तव्य केलं नसलं तरी जनता दल युनायटेडच्या नेत्यांनी सातत्याने याबाबत वेगवेगळी वक्तव्ये केली आहे. जदयू आमदार गोपाल मंडल दोन दिवसांपूर्वी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीवेळी म्हणाले होते की, नितीश कुमार हेच पंतप्रधानपदाचे योग्य उमेदवार आहेत. देशभरातली जनता मल्लिकार्जुन खरगेंना ओळखत नाही. पत्रकार उल्लेख करू लागल्यानंतर काहीजण खरगेंना ओळखू लागले आहेत. देशभरातले लोक नितीश कुमार यांना ओळखतात. खरगेंना कोणीच ओळखत नाही. काही ठराविक लोक खरगेंना ओळखतात, सामान्य जनता त्यांना ओळखत नाही. त्यामुळे नितीश कुमारच पंतप्रधान होतील. इंडि आघाडीला निमंत्रक किंवा समन्वयक असला पाहिजे, असा मुद्दा शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारच्या बैठकीपूर्वी उपस्थित केला होता. तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आघाडीच्या बैठकीत हाच मुद्दा उचलून पंतप्रधानपदासाठी दलित चेहरा देण्याचा प्रस्ताव मांडला.

### एकत्र येऊन निवडणूक जिंकू

» त्यासाठी त्यांनी खरगेंचे नाव सुचवले होतं. यावर कोणीही आक्षेप घेतला नाही. उलट, द्रमुकचे प्रमुख आणि तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन, आपचे प्रमुख आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी खरगेंच्या नावाला पाठिंबा दर्शवला. आघाडीतल्या २८ घटक पक्षांपैकी १६ पेक्षा जास्त पक्षांनी खरगेंना पाठिंबा दिला असून यात शिवसेनेच्या ठाकरे गटाचाही समावेश असल्याचं सांगितलं जात आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या इंडी आघाडीच्या बैठकीत आघाडीतल्या नेत्यांनी पंतप्रधानपदासाठी खरगे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला. यावर काही पक्षांची सहमती दर्शवली असली तरी अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. याबाबत पत्रकार परिषदेत खरगे यांना प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले, "आधी एकत्र येऊन निवडणूक जिंकू, मग पंतप्रधानपदाचा विचार करू." तसेच खरगे यांनी पंतप्रधानपदाबाबतच्या चर्चा नाकारल्या नाहीत.

# समलिंगी विवाहांना कायदेशीर मान्यता नाही

## » काश्मीरमधील कलम 370 रद्द करणे योग्य

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सरतं २०२३ हो वर्ष बऱ्याच अर्थाने महत्त्वाचं ठरलंय. कारण गेल्या वर्षभरात असे अनेक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने घेतले आहेत, ज्याचा दुरगामी परिणाम होणार आहे. अर्थात, सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचणारी प्रकरणे आणि या प्रकरणांमधून न्यायालयाने घेतलेले निर्णय हे देशपातळीवर सर्वच अंगांनी विचार करण्यासारखे आणि नागरिकांच्या जीवनात बदल घडवणारे असतात.**



त्यामुळे गेल्या वर्षभरात सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या काही महत्त्वाच्या निर्णयांचा आपण आढावा घेणार आहोत. जेणेकरून येत्या नव्या वर्षात सार्वजनिक ठिकाणी कायदेशीररित्या कसं वागावं याचा अंदाज येऊ शकेल. सर्वोच्च न्यायालय हे देशातील सर्वांत महत्त्वाचं न्यायालय असतं. या न्यायालयाची स्थापना अनुच्छेद १२४ अंतर्गत करण्यात आली आहे. कायद्यांची व्याख्या बनवणं आणि त्यादृष्टीने निर्णय घेण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाकडे असतो. तसंच, देशभरातील उच्च न्यायालय आणि इतर कनिष्ठ न्यायालयात घेतलेल्या निर्णयांचा फेरविचार करण्याचा अधिकारही सर्वोच्च न्यायालयाकडे असतो. तसंच, नागरिकांच्या मुलभूत हक्कांचं संरक्षण करण्याचीही जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाची असते. चलनातून एक हजार आणि ५०० रुपयांच्या नोटा बाद करण्याचा केंद्र सरकारचा सहा वर्षांपूर्वीचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने जानेवारी महिन्यात चारविरुद्ध एक अशा बहुमताने वैध ठरवला. सरकारने कार्यपद्धतीचे पालन केल्याने नोटाबंदीच्या निर्णयप्रक्रियेत दोष नव्हता, असा निर्वाळा न्यायालयाने निकालात दिला. नोटा रद्द करण्याच्या निर्णयात कोणत्याही कायदेविषयक किंवा घटनात्मक त्रुटी नसल्याचा निर्वाळाही न्यायमूर्ती एस. अब्दुल नझीर यांच्या नेतृत्वाखालील पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने दिला. नोटाबंदीच्या निर्णयाबाबत भारतीय रिझव्ह बँक (आरबीआय) आणि केंद्र सरकारमध्ये सहा महिने चर्चा झाली होती, असेही घटनापीठाने नमूद केले. तसेच नोटाबंदीचा निर्णय हा कार्यकारी यंत्रणेचे आर्थिक धोरण असल्याने तो फिरवणे शक्य नाही, असे निरीक्षण नोंदवत आर्थिक धोरणाच्या बाबतीत मोठा संयम आवश्यक असून न्यायालय न्यायिक पुनर्विलोकनाद्वारे कार्यकारी यंत्रणेचा निर्णय बदलू शकत नाही, असेही घटनापीठाने स्पष्ट केले.

# युद्धाच्या सावटाखाली आशेचा नाताळ!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

इस्रायल-हमास युद्ध आणि रशिया-युक्रेन युद्धाबरोबरच अन्यत्र सुरू असलेले देशांतर्गत सशस्त्र संघर्ष यामुळे विविध देशांमधील शांतता बिघडलेली असताना या सर्व चिंता दूर सारून जगभरात नाताळ साजरा करण्यात जात आहे. न्यूयॉर्कमधील सेंट पॅट्रिक्स कॅथेड्रल येथे रविवारच्या सामुदायिक प्रार्थनेच्या वेळी कार्डिनल टिमोथी डोलन यांनी श्रद्धाळूंना पश्चिम आशियातील युद्धग्रस्त भागातील लोकांसाठी प्रार्थना करण्याचे आवाहन केले. जगभरातील ख्रिश्चन भाविकांसाठी पवित्र भूमी मानले जाणाऱ्या बेथलहेम आणि जेरुसलेमवर इस्रायल-हमास युद्धाचे सावट पडले आहे. युद्धामुळे बेथलहेम येथील नाताळ पूर्वसंध्येचा सोहळा रद्द करण्याची वेळ आली. 'पवित्र भूमी हिंसा, द्वेष आणि सूडभावनेने झाकोळलेली आहे,' अशी खंत कार्डिनल डोलन यांनी व्यक्त केली. पश्चिम आशियातील सीरिया दीर्घकाळ चाललेल्या अंतर्गत यादवीमुळे त्रस्त आहे. राजधानी दमास्कस येथे घरे, दुकाने रोषणाई आणि ख्रिसमस ट्रीने सजली आहेत. तरीही गाझामधील घटनांमुळे सणाचा आनंद कमी झाला आहे. दमास्कसमधील सेंट कॉन्स्टंटिन अँड हेलेन कॅथेड्रल येथे युद्धाचे दु:ख कमी करून आनंद पसरवण्यासाठी ईश्वराने शक्ती द्यावी अशी प्रार्थना करण्यात आली. युरोपमध्येही नाताळ साजरा केला जात आहे. ऐतिहासिक कॅथेड्रल, बाजारपेठांमध्ये गाझा आणि युक्रेन युद्धाचा तणाव विसरण्याचा प्रयत्न केला जात आहे. जर्मनीच्या कोलोन कॅथेड्रलमध्ये सुरक्षेच्या कारणावरून पर्यटकांसाठी प्रवेश बंद करण्यात आला.

# मैं अटल हूं चित्रपटातील 'देश पहले' गाणं रिलीज

आज अटल बिहारी वाजपेयी (ATAL BIHARI VAJPAYEE) यांची 99 वी जयंती आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त 'मैं अटल हूं' (MAIN ATAL HOON) या चित्रपटातील 'देश पहले' हे गाणं रिलीज करण्यात आलं आहे. या गाण्यातील पंकज त्रिपाठी (PANKAJ TRIPATHI) यांच्या अभिनयानं अनेकांचे लक्ष वेधले आहे. पंकज त्रिपाठी यांनी आपल्या अभिनयाने लोकांच्या मनात खास स्थान निर्माण केले आहे. 'मैं अटल हूं' या चित्रपटात पंकज त्रिपाठी हे अटल बिहारी वाजपेयी यांची भूमिका साकारणार आहेत. या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत असतात. काही दिवसांपूर्वी 'मैं अटल हूं' या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज करण्यात आला. आता या चित्रपटामधील 'मैं अटल हूं'



हे गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. पंकज त्रिपाठी यांनी हे गाणे सोशल मीडियावर शेअर करुन कॅप्शनमध्ये लिहिलं,"दुनिया के सारे सुख पीछे, मेरा देश पहले।"'देश पहले' हे गाणे जुबिन नौटियाल यांनी गायलेले गाणे, या गाण्याचे गीतकार मनोज मुंतशिर हे आहेत तर पायल देव यांनी हे गाणे संगीतबद्ध केले आहे. या गाण्याला नेटकऱ्यांची पसंती मिळत आहे. रवी जवध यांनी दिग्दर्शित केलेल्या 'मैं अटल हूं' हा चित्रपट पुढील वर्षी 19 जानेवारीला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची कथा भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जीवनावर आधारित आहे. आता पंकज त्रिपाठी यांच्या मैं अटल हूं' या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.

## डंकी'ने पार केला 100 कोटींचा टप्पा

बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खान (SHAH RUKH KHAN) सध्या त्याच्या आगामी 'डंकी' (DUNKI) या सिनेमामुळे चर्चेत आहे. बॉक्स ऑफिसवर दिवसेंदिवस हा सिनेमा चांगलाच धमाका करत आहे. वीकेंडला बॉक्स ऑफिसवर किंग खानच्या 'डंकी'ची जादू दिसली आहे. 'डंकी'ने 100 कोटींचा टप्पा पार केला आहे. सॅकनिल्क एंटरटेनमेंटच्या रिपोर्टनुसार, 'डंकी' या सिनेमाने रिलीजच्या पहिल्या दिवशी अर्थात ओपनिंग डेला 29.2 कोटींची कमाई केली आहे. दुसऱ्या दिवशी 31.10 कोटी, तिसऱ्या दिवशी 27.29 कोटी आणि चौथ्या दिवशी 31.50 कोटींची कमाई केली आहे. एकंदरीतच रिलीजच्या चार दिवसांत या सिनेमाने 106.43 कोटींचा गल्ला जमवला आहे.'पठाण' (PATHAAN) आणि 'जवान' (JAWAN) या सिनेमाचा रेकॉर्ड 'डंकी'ला (DUNKI) या सिनेमाला पार करता आला नाही. कौटुंबिक नाट्य असलेल्या 'डंकी' या सिनेमाला प्रेक्षकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. रिलीजच्या चार दिवसांत या सिनेमाने 100 कोटींचा टप्पा पार केला आहे.

## गौतमी पाटील बनली पोलीस ऑफिसर?



नृत्यांगना गौतमी पाटील (GAUTAMI PATIL) नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. गौतमीचा मोठा चाहतावर्ग असून तिच्या दिलखेच अदा चाहत्यांच्या पसंतीस उतरत असतात. गौतमीने आता मराठी सिनेसृष्टीतही पदार्पण केलं आहे. 'घुंगरू' या सिनेमाच्या माध्यमातून ती प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. आता गौतमीचं 'लीज लई कडक' हे गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. ठसकेबाज गाण्यांवर प्रेक्षकांना ठेका धरायला लावणाऱ्या गौतमी पाटीलने अवघ्या महाराष्ट्राला वेड लावलं आहे. मात्र आता गौतमी पाटील 'इश्काचा मौका आणि झाला नजरेचा धोका... आता कसं व्हायचं पावन, चीझ मी लई कडक' म्हणत आहे. सप्तसूर म्युझिकच्या नव्याकोऱ्या गाण्यात गौतमी पाटील झळकली असून या गाण्याचा म्युझिक व्हिडिओ सप्तसूर म्युझिकच्या यूट्यूब चॅनलवर लाँच करण्यात आला आहे. सप्तसूर म्युझिकच्या साईनाथ राजाध्यक्ष, बीना राजाध्यक्ष यांनी चीझ लई कडक या म्युझिक व्हिडिओची निर्मिती केली आहे. विकी वाघ यांनी गीतलेखन आणि संगीत दिग्दर्शन केलेलं हे गाणं वैशाली सामंत यांनी गायलं आहे. तर या गाण्यात गौतमी पाटीलसह कुणाल पाटील, कुणाल मासले, मनोज कुंभार, आदम शेख यांनी भूमिका केली आहे. अतिशय धमाल शब्द, ठेका धरायला लावणारी उडती चाल असल्याने हे गाणं नक्कीच प्रेक्षकांची दाद मिळवणार यात काहीच शंका नाही. 'चीझ लई कडक' या गाण्यात एक गोष्ट सांगण्यात आली आहे. गुंडांच्या अड्डयावर होणाऱ्या या गाण्यात गौतमी पाटील नेमक काय करते हे जाणून घेण्यासाठी हा म्युझिक व्हिडिओ पूर्ण पाहणं गरजेचं आहे. मात्र 'चीझ लई कडक' हे गाणं प्रेक्षकांना वेड लावणारं 'आयटम साँग ऑफ द ईअर' ठरणार आहे. गौतमीची हटके गाणी नेहमीच प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत असतात. माझा कारभार सोपा नसतोय रं, दिलाचं पाखरू, सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम, पाटलांचा बैलगाडा अशा तिच्या गाण्यांना प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली आहे. सोशल मीडियावरही गौतमी चांगलीच ॲक्टिव्ह आहे.नृत्यांगना गौतमी पाटील (GAUTAMI PATIL) नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. गौतमीचा मोठा चाहतावर्ग असून तिच्या दिलखेच अदा चाहत्यांच्या पसंतीस उतरत असतात. गौतमीने आता मराठी सिनेसृष्टीतही पदार्पण केलं आहे. '

## सुशांत सिंह राजपूतच्या आयुष्यावर येणार सिनेमा?

दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत (SUSHANT SINGH RAJPUT) आजही चाहत्यांच्या मनात जिवंत आहे. 14 जून 2020 रोजी सुशांतने आत्महत्या करत आपलं आयुष्य संपवलं. सुशांतने आत्महत्या केली की त्याची हत्या झाली हे अद्याप समोर आलेलं नाही. आता सुशांत सिंह राजपूतच्या आयुष्यावर सिनेमा येणार असल्याची चर्चा आहे. सिने-निर्माता संदीप सिंह (SANDEEP SINGH) या सिनेमाची निर्मिती करू शकतो. सुशांत सिंह राजपूतच्या आत्महत्येनंतर चाहत्यांना मोठा धक्का बसला. आत्महत्येच्या तीन वर्षांनंतरही चाहत्यांमध्ये त्याची चांगलीच क्रेझ आहे. सुशांतचे सर्वच सिनेमे चाहत्यांच्या पसंतीस उतरले आहेत. या सिनेमांनी प्रेक्षकांचं चांगलच मनोरंजन केलं आहे. अभिनेत्याचा खास मित्र संदीप सिंहने नुकतचं एका सिनमाच्या प्रमोशनदरम्यान खुलासा केला आहे की,"सुशांतचं आयुष्य लवकरच रुपेरी पडद्यावर येईल". सुशांत सिंह राजपूतवर सिनेमा येणार का? असा प्रश्न संदीपला विचारण्यात आला. या प्रश्नाचं उत्तर देत संदीप म्हणाला,"अजिबात नाही. मला वाटतं सुशांत सिंह राजपूत हा विषय लोकांनी शांततेत घ्यायला हवा. मी त्याच्या आयुष्यावर कधीही सिनेमा बनवणार नाही. सुशांतच्या आयुष्यावर मी सिनेमा बनवावा यासाठी मला चांगले पैसेदेखील देण्यात येत आहेत. सुशांतच्या आयुष्यावर सिनेमा आला तर तिच्या मित्रांना आणि कुटुंबियांनाच या गोष्टीचा त्रास होणार आहे". संदीप पुढे म्हणाला,"2024 हे वर्ष माझं कमबॅक असणार आहे". सुशांत सिंह राजपूतने 14 जून 2020 रोजी मुंबईतील राहत्या घरी बांद्रा येथे आत्महत्या केली. त्याच्या आत्महत्येने सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे. सध्या सीबीआय याप्रकरणाची चौकशी करत आहे". सुशांतच्या आयुष्यावर सिनेमा येणार नसल्याने त्याचे चाहते नाराज झाले आहेत.

## रणबीर-आलिया यांची क्यूट लेक पहिल्यांदा पापाराझीसमोर

अभिनेता रणबीर कपूर (RANBIR KAPOOR) आणि अभिनेत्री आलिया भट्ट (ALIA BHATT) यांनी त्यांची मुलगी राहाचा चेहरा पहिल्यांदा पापाराझीसमोर रिव्हिल केला आहे. आलिया आणि रणबीर हे सोमवारी ख्रिसमस लंच प्रोग्रॅमसाठी गेले होते. यावेळी त्यांच्यासोबत राहा देखील होती. आलिया आणि रणबीर यांनी राहासोबत पापाराझीला फोटोसाठी पोज दिल्या. ख्रिसमस लंच प्रोग्रॅमसाठी कपूर कुटुंबानं खास लूक केला होता. यावेळी राहा ही व्हाईट फ्रॉक, दोन पोनी टेल आणि रेड शूज अशा क्युट





लूकमध्ये दिसली. राहाचे फोटो आणि व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. ज्यावर नेटकरी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. आलिया आणि रणबीर यांनी त्यांच्या मुलीचा चेहरा पहिल्यांदा पापाराझीसमोर रिव्हिल केला आहे. राहाचे फोटो आणि व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यावर एका नेटकऱ्यानं कमेंट केली, "राहा खूपच क्यूट दिसते"तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "राहाचे डोळे खूपच सुंदर आहेत. राहा तिच्या आईसारखीच क्यूट आहे." सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये रणबीरनं राहाला उचललं आहे, असं दिसत आहे. राहाचा जन्म 6 नोव्हेंबर 2022 रोजी झाला.

# पराभवाचे दु:ख कमी होईल!

## » टीम इंडिया मोठ्या विजयासाठी आतुर : रोहित शर्मा

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेला मंगळवारपासून (२६ डिसेंबर) सुरुवात होणार आहे. सामन्याच्या एक दिवस आधी टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माने पत्रकार परिषदेत संघाच्या योजनेविषयी सांगितले. विश्वचषकातील पराभवानंतर तो म्हणाला की, "ही मालिका जिंकणे हे आमचे ध्येय आहे. संघ पूर्णपणे तयार आहे आणि अंतिम फेरीतील पराभवानंतर आम्ही पुढे सरसावले आहोत.**

रोहितने असेही सांगितले की, "कर्णधार या नात्याने आपल्या संघातील इतर खेळाडूंनी जे निकाल मिळवले आहेत ते येथे मिळवावेत अशी माझी इच्छा आहे." भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेत चांगली कामगिरी करू शकलेला नाही. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० मालिकेत हिटमॅन खेळला नाही. तो दक्षिण आफ्रिकेतील टी-२० आणि एकदिवसीय मालिकेपासूनही दूर राहिला. रोहित शर्मा म्हणाला की, "आम्ही या मालिकेसाठी सज्ज आहोत. येथील परिस्थिती गोलंदाजांना मदत करते. सेंच्युरियनमध्ये पाच दिवस फलंदाजी करणे सोपे नाही. आम्हाला याचा अनुभव आहे. जसजसा सामना पुढे जाईल तसतशी आमच्यापुढील आव्हाने वाढतील. या सर्व आव्हानांचा सामना करण्यासाठी आम्ही तयारी केली आहे. संघात याबद्दल चर्चा झाली आहे. आठवड्याभरापूर्वीच आम्ही इथे आलो असून सर्व खेळाडूंना त्यांच्या पद्धतीने खेळण्याचे स्वातंत्र्य आम्ही दिले आहे.

हिटमॅन म्हणाला, "येथे सर्व गोलंदाजांचे योगदान महत्त्वाचे आहे. वेगवान गोलंदाजांशिवाय फिरकीपटूही महत्त्वाचे आहेत. आमच्याकडे दोन अनुभवी फिरकीपटू आहेत (रविचंद्रन अश्विन आणि रवींद्र जडेजा). त्यांच्याकडून इथल्या खेळपट्टीवर संघाला काय हवंय, ते त्यांना माहीत आहे. त्यांच्याशी जास्त बोलण्याची गरज नाही. दोघेही खूप शानदार गोलंदाजी करत आहेत. जेव्हा जेव्हा त्यांच्या हातात चेंडू असतो तेव्हा ते विकेट घेण्याचा प्रयत्न करत असतात. रोहित म्हणाला,




"आम्ही विश्वचषकात ज्या प्रकारे खेळलो ते पाहता विश्वचषक गमावणे खूप कठीण होते. आम्हा सर्वांसाठी ते खूप अवघड होते. पहिल्या १० सामन्यांमध्ये आम्ही चमकदार कामगिरी केली होती. अंतिम फेरीत असे होऊ शकले नाही आणि आम्ही हरलो. अशा पराभवानंतर बाहेर पडणे कठीण आहे, परंतु त्यानंतर बरेच क्रिकेट घडत आहे आणि तुम्हाला त्यासह पुढे जावे लागेल. मलाही पुढे जाणे अवघड आहे. आम्हाला बाहेरून खूप पाठिंबा मिळाला. याने मला खूप प्रेरणा दिली. भारतीय कर्णधार म्हणाला, "सर्व खेळाडूंच्या कारकिर्दीत वेगवेगळ्या भूमिका असतात. के.एल. राहुल त्यापैकीच एक. विश्वचषकात त्याने विकेटकीपिंग केले. त्याने स्वतः पुढे येऊन हे आव्हान स्वीकारले. यामुळे आम्हाला अतिरिक्त फलंदाज ठेवण्याचे स्वातंत्र्य मिळते. गेल्या वेळी तो इथे सलामीवीर म्हणून खेळला होता, मात्र यावेळी तो मधल्या फळीत खेळणार आहे. तो अनुभवी आहे आणि खेळाच्या वेगवेगळ्या वेळी संघाला त्याच्याकडून काय हवे आहे, हे त्याला ठाऊक आहे. तो किती काळ विकेटकीपिंग करेल, हे आम्हाला माहीत नाही. हिटमॅन शर्मा म्हणाला, "जेव्हाही तुम्ही अशा खेळपट्ट्यांवर खेळता जिथे उसळी असते, तेव्हा फलंदाजांना ते खूप आवडते. चेंडू बॅटवर व्यवस्थित येतो. जर तुम्ही त्यांच्या गोलंदाजांविरुद्ध योग्य रणनीती आखली तर तुम्ही धावा करू शकता. मात्र, हे करणे तितके सोपे नाही. इथे तुम्हाला एक गोष्ट लक्षात ठेवावी लागेल की तुम्ही

### सर्व गोलंदाजांचे योगदान महत्त्वाचे

» रोहितने असेही सांगितले की, "कर्णधार या नात्याने आपल्या संघातील इतर खेळाडूंनी जे निकाल मिळवले आहेत ते येथे मिळवावेत अशी माझी इच्छा आहे." भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेत चांगली कामगिरी करू शकलेला नाही. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० मालिकेत हिटमॅन खेळला नाही. तो दक्षिण आफ्रिकेतील टी-२० आणि एकदिवसीय मालिकेपासूनही दूर राहिला. रोहित शर्मा म्हणाला की, "आम्ही या मालिकेसाठी सज्ज आहोत. येथील परिस्थिती गोलंदाजांना मदत करते. सेंच्युरियनमध्ये पाच दिवस फलंदाजी करणे सोपे नाही. आम्हाला याचा अनुभव आहे. जसजसा सामना पुढे जाईल तसतशी आमच्यापुढील आव्हाने वाढतील. या सर्व आव्हानांचा सामना करण्यासाठी आम्ही तयारी केली आहे. संघात याबद्दल चर्चा झाली आहे. आठवड्याभरापूर्वीच आम्ही इथे आलो असून सर्व खेळाडूंना त्यांच्या पद्धतीने खेळण्याचे स्वातंत्र्य आम्ही दिले आहे. हिटमॅन म्हणाला, "येथे सर्व गोलंदाजांचे योगदान महत्त्वाचे आहे. वेगवान गोलंदाजांशिवाय फिरकीपटूही महत्त्वाचे आहेत.

कधीही बाद होऊ शकता. आम्ही येथे कधीही मालिका जिंकलेली नाही. जिंकलो तर आनंदच होईल, पण विश्वचषकातील पराभवाचे दुःख कमी होईल की नाही हे माहीत नाही. प्रत्येकजण मेहनत घेत आहे. आपल्याला काहीतरी किंवा दुसरे जिंकायचे आहे. आमच्याकडे सर्व प्रकारचे खेळाडू आहेत. मोकळेपणाने खेळावे लागेल आणि कोणत्याही गोष्टीचा जास्त विचार करू नये. भारतीय कर्णधार म्हणाला, "मुकेश आणि प्रसिध यांच्यापैकी एकाची निवड करणे कठीण आहे. आम्ही के.एल. राहुल आणि राहुल भाई (द्रविड) यांच्याशी बोललो आहोत. मुकेश आणि प्रसिध हे दोघेही वेगवेगळ्या प्रकारचे गोलंदाज आहेत. प्रसिध उंच आहे आणि खेळपट्टीवरून बरेच काही साध्य करू शकतो. जर मुकेशबद्दल सांगायचे तर सहा महिन्यांत तो खूप सुधारला आहे. आमच्याकडे सिराज आणि बुमराह आहेत. आता मुकेश आणि प्रसिध यांच्यात कोणत्या गोलंदाजाची गरज आहे हे पाहायचे आहे. याबाबत आमची चर्चा सुरू आहे.

# ऑस्ट्रेलियाविरुद्ध मालिकेसाठी महिला संघ जाहीर

## » वेगवान गोलंदाज रेणुका ठाकूर यांचे वनडे संघात पुनरागमन

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय आणि टी-२० मालिकेसाठी भारतीय महिला संघाची घोषणा केली आहे. यष्टिरक्षक फलंदाज रिचा घोष आणि वेगवान गोलंदाज रेणुका ठाकूर यांचे वन डे संघात पुनरागमन झाले आहे.**

वानखेडे स्टेडियमवर २८ डिसेंबर ते २ जानेवारी दरम्यान एकदिवसीय सामने खेळवले जातील, तर टी-




२० सामने नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर ५ ते ९ जानेवारी दरम्यान आयोजित करण्यात आले आहेत. या जुलैमध्ये बांगलादेशविरुद्धच्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी रिचा घोषची निवड करण्यात आली नव्हती. आता पाच महिन्यांनंतर ती एकदिवसीय संघात परतली आहे. वानखेडे स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकमेव कसोटीत रिचाला तिच्या चमकदार कामगिरीचे बक्षीस मिळाले आहे. त्याचबरोबर वेगवान गोलंदाज रेणुका सिंग ठाकूर, तीतस साधू आणि दावखुरी फिरकीपटू सायका इशाक यांचीही संघात समावेश करण्यात आला आहे. अलीकडेच इंग्लंडविरुद्धच्या टी-२० दमदार कामगिरी करणाऱ्या श्रेयंका पाटीलचाही प्रथमच एकदिवसीय संघात समावेश करण्यात आला आहे. बांगलादेशविरुद्धची शेवटची एकदिवसीय मालिका खेळलेल्या आणि सध्याच्या संघात समाविष्ट असलेल्या खेळाडूंमध्ये मेघना सिंग, देविका वैद्य आणि प्रिया पुनिया यांचा समावेश आहे. इंग्लंडविरुद्धच्या मागील मालिकेतील टी-२० आंतरराष्ट्रीय संघात कोणताही बदल करण्यात आलेला नाही, ज्यामध्ये भारतीय

### कसोटी जिंकत रचला इतिहास

» तिसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या डावात ५ बाद २३३ धावा केल्या होत्या. त्यांच्याकडे ४६ धावांची आघाडी होती. कांगारूंचा संघ चौथ्या दिवशी दुसऱ्या डावात २६१ धावांवर सर्वबाद झाला. त्यांना एकूण ७४ धावांची आघाडी मिळाली. त्यामुळे भारताला विजयासाठी ७५ धावांचे लक्ष्य मिळाले.

महिला संघाला २-१ अशा फरकाने पराभवाला सामोरे जावे लागले होते. हरमनप्रीत कौर अँड कंपनीने कसोटी सामन्यात इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाचा पराभव केला आहे. आणि त्यांना भारतीय भूमीवरही पराभूत करणे सोपे जाणार नाही. भारतीय महिला संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिल्यांदाच कसोटी सामना जिंकत इतिहास रचला आहे. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर संपन्न झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात टीम इंडियाने कांगारूंचा तब्बल आठ गडी राखून धुव्वा उडवला आहे.